# एपीएल अपोलोच्या एसजी स्पोर्ट्सने सिएट इंडियन सुपरक्रॉस रेसिंग लीगमध्ये एक फ्रंचाईझी टीम संपादित केली

- आघाडीचे स्टील ट्यूब उत्पादक एपीएल अपोलो समूहाची (APL Apollo Group) क्रीडा शाखा असलेले एसजी स्पोर्ट्स (SG Sports) आता सिएट इंडियन सुपरक्रॉस रेसिंग लीगमधील (*CEAT Indian Supercross Racing League) संघांच्या मालकांपैकी एक झाले आहे.*
- *या संघाचे नाव एसजी स्पीड रेसर्स (SG Speed Racers) असेल आणि हा संघ दिल्लीचा असेल.*
- *भारतातील क्रीडा चैतन्याला उत्तेजन देणे आणि उभरत्या खेळाडूंना जागतिक स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देणे हे एसजी स्पोर्ट्सचे (SG Sports) ध्येय आहे.*
- *ऑक्टोबर २०२३ मध्ये चालू होणाऱ्या लीगच्या या पदार्पणाच्या म्हणजेच पहिल्या हंगामात टीम एसजी स्पीड रेसर्स (SG Speed Racers) सर्वोत्कृष्ट पुरस्कारासाठी लढेल.*

**पुणे, ऑगस्ट १०, २०२३:** बुद्धीबळापासून ते आता रेसिंगपर्यंत; एपीएल अपोलोचे (APL Apollo) एसजी स्पोर्ट्स (SG Sports) पुन्हा एकदा एका दुसऱ्या लीगला हलवून टाकण्यासाठी सज्ज झाले आहे. यावेळी ते हृदयाचे ठोके वाढवणारे, खऱ्या खुऱ्या ॲक्शननी आणि तीव्र स्पर्धेने भरलेले असेल. टेक महिंद्रा ग्लोबल चेस लीगमध्ये एसजी अल्पाइन वॉरिअर्स या संघाच्या फ्रँचाइझीच्या अनोख्या अनुभवानंतर आता एसजी स्पोर्ट्सने (SG Sports) सिएट इंडियन सुपरक्रॉस रेसिंग लीगमध्ये (CISRL) एसजी स्पीड रेसर्सच्या (SG Speed Racers) फ्रेंचाइझीसह एका नवीन प्रवासाला सुरुवात केली आहे. फेडरेशन ऑफ मोटर स्पोर्ट्स क्लब ऑफ इंडिया (FMSCI) च्या सहभागीदारीने ही लीग चालू होत आहे. ही भारतातील पहिली फ्रँचाइझीवर आधारित सुपरक्रॉस रेसिंग लीग आहे, जी जगभरातील चालकांना वेगवेगळ्या प्रकारे आणि निरनिराळ्या श्रेणीमध्ये स्पर्धा करण्यासाठी एकत्र आणत आहे.

एपीएल अपोलो (APL Apollo) हे देशातील अग्रणी असे क्रमांक एकचे स्ट्रक्चरल

स्टील ट्यूबिंग ब्रँड असून त्यांचा देशांतर्गत बाजारपेठेतील बाजारहिस्सा जवळपास ५५% आहे. आयपीएल मध्ये दिल्ली कॅपिटलची सलग तीन वर्षे मुख्य प्रायोजक असल्यामुळे एपीएल अपोलो (APL Apollo) दीर्घ काळापासून क्रीडा क्षेत्राशी संबंधित आहे.

एपीएल अपोलो समूहाचे (APL Apollo) प्रमुख व्यवस्थापकीय संचालक (CMD) श्री. संजय गुप्ता यांना खेळाची प्रचंड आवड आहे. येत्या काही वर्षात क्रीडा क्षेत्रामध्ये वाढीची प्रचंड शक्यता असल्या त्यांचा अंदाज आहे. नवोदित उभरत्या खेळाडूंनी पुढे येण्यासाठी आणि त्यांच्या उत्कर्षासाठी एक मजबूत व प्रभावी व्यासपीठ उपलब्ध करवून भारतातील क्रीडा जगतामध्ये क्रांती आणणे ही एसजी स्पोर्ट्सची (SG Sports) स्वप्नदृष्टी आहे. ब्रँडिंग ॲक्टिव्हिटी आणि जागतिक एक्सपोजर यांच्या माध्यमातून भारतीय क्रीडा क्षेत्र आणि खेळाडू यांच्या क्षमता वाढवण्यावर कंपनीचा विश्वास आहे.

यावेळी बोलताना **एपीएल अपोलो समूहाचे प्रमुख व्यवस्थापकीय संचालक (CMD) श्री. संजय गुप्ता** म्हणाले, *"सिएट इंडियन सुपरक्रॉस रेसिंग लीगमधील (CISRL) एका संघाच्या संपादनासह आम्ही सुपरक्रॉसच्या रोमांचकारी जगात प्रवेश करत असल्याने आजचा दिवस म्हणजे एसजी स्पोर्ट्ससाठी (SG Sports) एक महत्त्वाचा व रोमांचकारी असा टप्पा आहे. क्रीडा क्षेत्रामध्ये उत्कृष्टता आणण्याचा आमचा वारसा आम्हाला सुपरक्रॉसला संपूर्ण भारतभर विकसित करण्यासाठी प्रोत्साहित करून चालना देत आहे. जागतिक दर्जाच्या अत्याधुनिक सुविधा आणि एफएमएससीआय (FMSCI) च्या अढळ पाठिंब्याच्या बळावर आम्ही जागतिक स्तरावर स्पर्धा करू शकतील अश्या उत्कृष्ट व प्रतिभावान चालकांची एक नवीन पिढीच जोपासण्याचे स्वप्न पाहत आहोत. ही संधी दिल्याबद्दल आम्ही सिएट इंडियन सुपरक्रॉस रेसिंग लीगचे (CISRL) आभारी आहोत. भारतातील सुपरक्रॉसच्या विकासाचा वेग वाढवण्याची आणि जो जगभरात एक मानक ठरेल आणि जतन केला जाईल असा कायमस्वरूपी क्रीडा वारसा ठेवण्याची आम्ही आकांक्षा करतो."*

एसजी स्पोर्ट्स (SG Sports) सिएट इंडियन सुपरक्रॉस रेसिंग लीगचा(CISRL) एक भाग बनल्याबद्दल आनंद व उत्साह व्यक्त करताना **सुपरक्रॉस इंडिया प्रायव्हेट लिमिटेडचे सह-संस्थापक आणि संचालक श्री. वीर पटेल म्हणाले,** *"सिएट इंडियन सुपरक्रॉस रेसिंग लीगसोबत (CISRL) एसजी स्पोर्ट्स ची भागीदारी जाहीर करताना आम्ही आनंदी व रोमांचित झालो आहोत. एपीएल अपोलो समूहाची एक धोरणात्मक शाखा म्हणून एसजी स्पोर्ट्स (SG Sports) क्रीडा उद्योग क्षेत्रावर लक्षणीय प्रभाव पाडण्यासाठी कटिबद्ध आहे. आम्हाला विश्वास आहे की, ही भागीदारी सुपर क्रॉस रेसिंगच्या परिसंस्थेला अजून समृद्ध*

*करेल आणि देशभरातील लाखो युवा खेळाडूंना प्रेरणा देईल.”*

सिएट इंडियन सुपरक्रॉस रेसिंग लीगचा (CISRL) पहिला म्हणजेच उद्घाटनीय हंगाम ऑक्टोबर २०२३ मध्ये सुरू होण्यासाठी सज्ज आहे. या चैतन्यपूर्ण, ऊर्जावान व शक्तिशाली रेसिंग लीगमध्ये सर्वोत्तम सन्मान मिळविण्यासाठी आठ टीम फ्रँचायझी जोमाने तयारी करीत आहेत. ही लीग श्वास रोखून ठेवणारे चित्त थरारक कौशल्यांचे प्रदर्शन, तीव्र स्पर्धा आणि उत्साहवर्धक ॲक्शन्स अनुभवेल; जे संपूर्ण देशभरातील प्रेक्षकांना आणि क्रीडाप्रेमींना भुरळ घालतील.

एसजी स्पोर्ट्सच्या (SG Sports) सिएट इंडियन सुपरक्रॉस रेसिंग लीगमधील (CISRL) समावेशाबाबत भाष्य करताना **एफएमएससीआयच्या सुपरक्रॉस रेसिंग कमिशनचे चेअरमन श्री. सुजीत कुमार** म्हणाले, “एसजी स्पोर्ट्स (SG Sports) ही सिएट इंडियन सुपरक्रॉस रेसिंग लीगमधील (CISRL) एक उल्लेखनीय जोड आहे. एपीएल अपोलो ट्यूब्स लिमिटेडनी सिएट इंडियन सुपरक्रॉस रेसिंग लीगसोबत (CISRL) केलेली ही भागीदारी आपल्या देशातील क्रीडा क्षेत्राला चालना देण्याच्या त्यांच्या अढळ वचनबद्धतेलाच दर्शवते. खेळांचे संवर्धन करून लाखो तरुणांना त्यात समाविष्ट करून घेण्याची त्यांची स्वप्नदृष्टी ही आपल्या देशातील सुपरक्रॉसच्या विकासाच्या आमच्या मिशनशी सुसंगत आहे. आम्ही एसजी स्पोर्ट्सचे मनापासून स्वागत करतो आणि रेसिंग ट्रॅक वरील त्यांच्या आकर्षक कामगिरीचे साक्षीदार होण्याची आतुरतेने आकांक्षा करतो.”

## ABOUT THE PROMOTERS

**Team Supercross India (SXI), the parent company of CEAT Indian Supercross Racing League, is at the helm of a groundbreaking initiative led by former international racers, Veer Patel *(a two-time national SX Champion),* Eeshan Lokhande and Aashwin Lokhande.** Drawing upon their extensive personal experience and unwavering passion for the sport, they have meticulously conceptualized, identified crucial gaps, and delivered a League that is set to redefine Supercross racing on a global scale. With their deep understanding of the sport and relentless pursuit of excellence, they are paving the way for a new era of Supercross that will captivate audiences worldwide.

## ABOUT SG SPORTS PVT. LTD

SG Sports is the sports arm of APL Apollo Group, a Rs500bn conglomerate with a presence across India & Dubai. Established in 1986, the company aims to join in the race for the elevation of the sports spirit in India. As a market leader in the Indian steel tube industry, APL Apollo has enjoyed tremendous success in last 15 years. With its innovative product line and state-of-the-art 12 manufacturing plants, APL Apollo has set its sights on global domination.

## ABOUT CEAT INDIAN SUPERCROSS RACING LEAGUE:

The CEAT Indian Supercross Racing League (CEAT ISRL) is the world's first franchise-based Supercross league, a groundbreaking initiative that is set to revolutionize the way sports are perceived in India. It is here to create a global extravaganza, an awe-inspiring spectacle that will captivate Indian spectators like never before. CEAT ISRL have signed up with athletes around the world to compete in a variety of formats and categories, pushing the limits of their skills and inspiring Indian riders to reach new heights. Prepare to be amazed as our stage performers break records with their charismatic engagement, adding an extra layer of excitement to this premier motorsport event. The league is committed to providing a safe and competitive environment for riders of all ages and skill levels. The league also believes in giving back to the community and partnering with local organizations to promote youth development and environmental sustainability.

## FOR MEDIA QUERIES AND COMMUNICATIONS:

Argho Ajay Mukherji: +91 9970829068 | argho.mukherji@adfactorspr.com